हेल्पलाईन

अल्पसंख्याक समाजासाठी शासकीय कामकाजाबाबत वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन आणि केंद्र सरकार व राज्य शासनाने राज्यातील अल्पसंख्याक समाजासाठी सुरु केलेल्या विविध योजनांबाबत शंकाचे निरसन / मार्गदर्शन करण्यासाठी सन २०१० पासून राज्य शासनाकडून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयामध्ये हेल्पलाईन सेवा सुरु केली आहे.

सदर हेल्पलाईनद्वारे अल्पसंख्याकांना मिळणारे शैक्षणिक कर्ज, व्यवसायिक कर्ज, अल्पसंख्याक समाजासाठी असलेल्या शिष्यवृत्ती योजना, व इतर विविध योजना याबाबतची माहिती दिली जाते. तसेच सदर योजनेची ज्या कार्यालयाकडून अंमलबजावणी केली जाते त्या कार्यालयाचा पत्ता, वेबसाईट व दूरध्वनी क्रमांक दिला जातो.